## निवडक

### मडगाव भागात आज, उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** मडगाव कृष्ण मंदिर फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुंधवार दि. २६ रोजी सकाळी ९ ते संध्या ६ वाजेपर्यंत आकृती इमारत, जयदिप इमारत, जैन मंदिरासमोर, शालीमार सहकारी संस्था, शालीमार अपार्टमेंटलमोर आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे मडगांव ऑईल फॅक्टरी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत स्मारतन स्कुलासमोर, होनेस्ट रेसिडेन्सीजवळ, गार्डन भागात, सत्यजती क्लासीस आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### फोंडेगाळ कुडतरी भागात २७, २८ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** फोंडेगाळ कुडतरी ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत फोंडेगाळ भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे रायतोळे जुना ट्रान्सफोरमरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. २८ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत रायतोळे कंबोर्डा भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### वळशी येथे २७ रोजी खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** वाळशी  फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २७ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत वाळशी, महात्मे, नार्वेकर इमारत, मुळगांव, द लिला हॉलजवळ, साल्ढाणा आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही जुने गोवे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नाईक नवरे, विवा गोवा, कदंबा हाऊसिंग सोसायटी, उत्तम दर्शन, सल्ले ५९, हरबन्स विहार, बेलमोंत आणि कदंबा पटार भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### पणजीत २८ रोजी ‘यादीतलो रवींद्र केळेकर’

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** मिनेझीस ब्रागांझा संस्थेने शनिवार दि. २८ रोजी ’संस्कृत दिनाच्या’ शताब्दी समारंभाच्या निमित्ताने ’यादीतलो रवींद्र केळेकर’ हा साहित्यिक कार्यक्रम वास्को येथील एमईएस कॉलेजच्या सहकार्याने आयोजित केला आहे. हा कार्यक्रम सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे.
गोमंतकचे संपादक श्री राजू नायक, प्राचार्य श्रीमती मनस्वी कामत, सत्यवान नाईक, मिनेझीस ब्रागांझा संस्थेचे अध्यक्ष दशरथ परब, दिलीप बोरकर आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. गिरिश केळेकर ’यादीतलो रवींद्र केळेकर या विषयावर बोलतील’.
या कार्यक्रमाचे उद्दिष्ट साहित्याचे जतन करणे, विद्यार्थ्यांमध्ये कोकणी भाषेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि कोकणी साहित्याच्या क्षेत्रातील तरुण प्रतिभेला चालना देणे आणि राज्यातील कोकणी साहित्याच्या विकासावर आणि त्याच्या जतनावर विचारमंथन करणे असे आहे. या कार्यक्रमात  स्वर्गिय रवींद्र केळेकर यांच्यावरील छायाचित्र आणि पुस्तक प्रदर्शन, कविता वाचन आणि विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

---

### अंत्योदय अन्न योजनेतर्फे रेशन कार्डधारकांना ३५ किलो तांदूळ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** एप्रिल महिन्यात अंत्योदय अन्न योजनेच्या रेशन कार्डधारकांना प्रतिरेशनकार्ड  ३५ किलो फोर्टिफाईड तांदूळ मोफत देण्यात येईल. प्राधान्यक्रम कुटुंबांना लाभधारकामागे ५ किलो फोर्टिफाईड तांदुळ मोफत देण्यात येईल.
एपीएल कार्डधारकांना १२.५० रुपये दराने प्रती कार्ड १२ किलो तांदुळ आणि १० रूपये दराने ६ किलो गहू देण्यात येईल. कल्याणकारी संस्थां योजना कार्डधारकांना फोर्टिफाईड तांदूळ ६.१५ रूपये किलो आणि गहू ४.८० रूपये किलो दराने वितरीत करतील.
स्वस्त धान्य दुकान मालकांनी आपला धान्य कोटा उचलून ३१ मार्च पर्यंत रेशन कार्डधारकांना वितरीत करावा. रेशन कार्डधारकांनी आपला रेशन कोटा संबंधित स्वस्त धान्य दुकानातून न्यावा. धान्याविषयी कोणतीही तक्रार असल्यास रेशन कार्ड धारकांनी संबंधित मामलेदार किंवा नागरी पुरवठा आणि ग्राहक व्यवहार खात्याकडे करावी.

---



### पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात छोटे सायंटिस्ट उपक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २५ :** येथील गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि ज्ञानप्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ’छोटे सायंटिस्ट’ उपक्रम राबविण्यात आला. पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या ज्ञानदा सभागृहात झाला. शिक्षणशास्त्र शिकणाऱ्या विद्यांर्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमात एक नाविन्यतेचा भाग म्हणून छोटे सायंटिस्ट या इंटर्नशिप उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट शिक्षक घडविण्याबाबत कटिबध्द असलेले गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय विद्यार्थ्यांना अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असतात. शिक्षणशास्त्राचे धडे गिरवीताना प्रयोगक्षम शिक्षणही तेवडेच महत्त्वाचे असते. याचाच एक भाग म्हणजे छोटे सायंटिस्ट हा उपक्रम केला. विज्ञान पुस्तकातील अभ्यासक्रम छोट्या छोट्या गमतीदार प्रयोगातून त्याचा उलगडा करून विद्यार्थ्यांना तो विषय सोपा करून शिकवीणे, विद्यार्थ्यांच्या मनातील जीज्ञानाचा बाऊ घालवताना तो विषय रंजक पद्धतीने शिकवीणे या बाबतचे महत्त्वपूर्ण ज्ञान, ज्ञानप्रबोधिनीचे आशुतोष भुजबळ आणि अनुज भारव्दाज यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने दिले.
गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजित केलेल्या या इंटर्नशिप कार्यक्रमात प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतून निवडण्यात आलेल्या ३० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग दर्शवीला. विद्यार्थ्यांना छोटे सायंटिस्ट उपक्रमा संदर्भात व्याख्याने आयोजित करण्यापासून, त्यांची परिक्षाव्दारे निवड करणे, त्यांना प्रत्यक्ष कार्यशाळेत सहभागी करून घेत, त्यांच्या करवी हरमल पंचक्रोशी विद्यालयात इंटर्नशिप घडवून आणणे, हा सर्व दिड महिन्याचा उपक्रम विद्यार्थ्यांनी पूर्ण केला. छोटे सायंटिस्ट या महत्त्वपूर्ण उपक्रमात हरमल पंचक्रोशी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माननीय लक्ष्मीकांत पार्सेकर सर, तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडीत यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या छोटे सायंटिस्ट उपक्रमाचे संपूर्ण नियोजन व संयोजन महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. दुर्गेश माजिक यांनी केले.

# बेकायदेशीर ट्रक व्यवसायावर कारवाईची मागणी

## वाहतूक खात्याच्या नियमांचे उल्लंघन : पेडणे पोलिसांना कारवाईसंदर्भात निवेदन सादर

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. २५ :** शेजारील राज्यांतून मोठ्या प्रमाणावर बिगर–गोमंतकीय ट्रक व्यावसायिक गोव्यात प्रवेश करून खडी, चिरे, वाळू यांचा व्यवसाय बेकायदेशीरपणे करत असल्याची गंभीर तक्रार पेडणे येथील स्थानिक व्यावसायिकांनी केली आहे. कोणत्याही प्रकारचे वाहतूक शुल्क भरले जात नाही तसेच वाहतूक खात्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. कर भरण्याचे बंधन टाळून हे व्यावसायिक गोव्यात भाडेपट्टीवर राहून व्यवसाय करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी पेडणे पोलिस स्थानकाचे निरीक्षक सचिन लोकरे यांना ट्रक व्यावसायिक संघटनांनी निवेदन सादर करून त्वरित कठोर कारवाईची मागणी केली आहे. स्थानिक व्यावसायिकांचा आरोप आहे की, अन्य राज्यांमध्ये अशा प्रकारे बेकायदेशीर व्यवसाय करणे शक्य नाही, मात्र गोव्यात ही परिस्थिती निर्माण झाली असून सरकारी यंत्रणा याकडे दुर्लक्ष करत आहे.

यापूर्वी वाहतूक खात्याकडे या प्रकरणाची तक्रार देण्यात आली होती, परंतु कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. परिणामी, मोठ्या प्रमाणावर सरकारी महसूल बुडवून हे व्यावसायिक बेकायदेशीर मार्गाने व्यापार करत आहेत. विशेषतः मूळ गोमंतकीय ट्रक व्यावसायिकांना विविध प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्थानिक व्यावसायिकांवर दबाव आणण्याचे प्रकार वाढले असून, त्यांना धमक्या दिल्या जात असल्याचेही आरोप करण्यात आले आहेत.

गोव्यातील विविध भागांतील ट्रक व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने पेडणे पोलीस स्थानकावर धडक देत निषेध नोंदवला. पेडणे ट्रक असोसिएशनचे अध्यक्ष मिलिंद शेट्ये यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, बिगर–गोमंतकीय व्यावसायिक वाहतूक खात्याच्या नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या बिल्डिंग मटेरियल पुरवतात. यामुळे स्थानिक व्यावसायिकांना मोठा फटका बसत असून सरकारने आणि वाहतूक खात्याने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

ट्रक व्यावसायिक अविनाश भोबे यांनी सांगितले की, मूळ गोमंतकीय व्यावसायिक अनेक वर्षांपासून हा व्यवसाय करत आहेत. मात्र, बाहेरून आलेले व्यावसायिक कमी दरात व्यवसाय करून स्थानिकांना आर्थिक अडचणीत टाकत आहेत. त्यामुळे सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी त्यांची मागणी आहे.

स्थानिक युवक व्यावसायिक सुरेश गावस यांनी सांगितले की, गोव्यात नोकरीच्या संधी मर्यादित असल्याने त्यांनी व्यवसाय सुरू केला, मात्र वाढत्या बेकायदेशीर व्यवसायामुळे ते मोठ्या संकटात सापडले आहेत. पारंपरिक व्यवसायावर अतिक्रमण होत असल्याने गोमंतकीय युवा व्यावसायिकांसाठी हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

तर युवा व्यावसायिक वैष्णवी केरकर यांनी सांगितले की, बिगर–गोमंतकीय व्यावसायिक मोठ्या प्रमाणावर गोव्यात स्थायिक होत असल्यामुळे भविष्यात हा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सरकारने वेळीच लक्ष घालून स्थानिक व्यावसायिकांना प्राधान्य द्यावे आणि बेकायदेशीर व्यवसायांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# मारियो मिरांडा यांच्या सन्मानार्थ अत्याधुनिक संग्रहालय

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** प्रसिद्ध चित्रकार आणि व्यंगचित्रकार पद्मविभूषण दिवंगत मारियो मिरांडा यांच्या स्मरणार्थ गोवा सरकार जुन्या  सचिवालय इमारतीत (आदिल शाह पॅलेस) अत्याधुनिक संग्रहालय स्थापन करण्याच्या प्रक्रियेत आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मंगळवारी विधानसभेत ही माहिती दिली.

विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, सरकारला दिवंगत मारियो मिरांडांविषयी अपार आदर आहे. कला आणि संस्कृती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाला उचित सन्मान देण्यासाठी त्यांच्या कलाकृतींचे जतन आणि प्रदर्शित करण्यासाठी समर्पित संग्रहालय उभारले जाणार आहे.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सरकारने सचिव (संग्रहालय) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. या समितीत विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता किंवा त्यांचे प्रतिनिधी, मुख्य वास्तुविशारद मार्विन सी. गोम्स, संवर्धन वास्तुविशारद आर. केतक नाचिनोलकर, ख्रिश्चन कला संग्रहालयाच्या क्युरेटर नताशा दा कोस्टा फर्नांडिस, सुप्रसिद्ध कलाकार बैजू पार्थन, गोव्याचे इतिहास आणि पुरातत्त्व तज्ज्ञ रोहित फाळगावकर, वास्तुविशारद करमल (प्रीता) सरदेसाई, चित्रकार क्रेरोझिटो डिसूझा, माजी संचालक (नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट) अंजली सेन, चित्रकार विराज नाईक, छायाचित्र पत्रकार प्रशांत पंजियार आणि वास्तुविशारद तल्लुलाह डिसिल्वा यांचा समावेश आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले की, या संग्रहालयात काही गॅलरी केवळ मारियो डी मिरांडा यांना समर्पित असतील. समितीला या संग्रहालयाच्या स्थापनेसाठी मार्गदर्शन व पर्यवेक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. राज्य सरकारच्या या उपक्रमामुळे गोव्याच्या सांस्कृतिक वारशाला मोठी चालना मिळेल, तसेच पर्यटक आणि कला रसिकांसाठी हे संग्रहालय एक आकर्षण केंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# उसगाव येथील वर्कशॉपमध्ये मृतदेह आढळला

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २५ :** उसगाव येथील एका वर्कशॉपमध्ये मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली असून, ही घटना घातपात किंवा हत्या असण्याची शक्यता स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे. मात्र पोलिसांनी प्राथमिक तपासानुसार ही आत्महत्येची घटना असल्याचे स्पष्ट केले आहे. मंगळवारी सकाळी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.

स्थानिक पंचायत सदस्या मनीषा उसगावकर यांनी हा वर्कशॉप एमव्हीआर कंपनीचा असल्याचा दावा केला आहे. त्यांचा आरोप आहे की, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करण्यासाठी घाई केली. काही स्थानिक रहिवाशांनीही यासंदर्भात शंका उपस्थित केली असून, मृतदेह सापडण्याच्या एक दिवस आधी वर्कशॉपमध्ये मोठा वाद झाल्याचा त्यांना ऐकू आला होता. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.  डीवायएसपी शिवराम वायंगणकर यांनी मात्र हे सर्व आरोप फेटाळून लावत, प्राथमिक तपासानुसार ही आत्महत्येची घटना असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, शवविच्छेदन अहवालानुसार मृत्यूचा कारणही आत्महत्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.  पोलिसांच्या प्राथमिक अहवालानुसार, बिहारमधील रहिवासी जीतन शर्मा (उसगाव, फोंडा) याने नायलॉनच्या दोरीच्या साहाय्याने काजूच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. उसगाव पोलिस उपकेंद्राला (ओपी) फोन आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

मृताची पत्नी अलखी कुमारी हिच्याकडे चौकशी केली असता, मृत व्यक्ती दीर्घकाळ मद्यपानाच्या आहारी गेलेला असल्याची माहिती मिळाली. मृतदेहाचा पंचनामा करून पुढील तपासासाठी दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालय, मडगाव येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला.शवविच्छेदन अहवालात मान आकुंचन पावल्यामुळे श्वास गुदमरून मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास फोंडा पोलीस स्थानकाचे पीएसआय आशिष वेळीप करत आहेत.

# डिचोली, वाळपईत अवकाळी पावसाचा तडाखा

## वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पडझड : वीजपुरवठा खंडित : अग्निशामक दल मदतीला धावले





■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, वाळपई, दि. २५ :** अचानक पडलेल्या मुसळधार पडलेल्या डिचोली, वाळपईला अवकाळी पावसाने झोडपले. अनेक ठिकाणी पडझड झाली आहे. वृक्ष पडून काही घरांची वाहनांची तसेच वीज वाहिन्यांचे नुकसान झाले.

डिचोली, वाळपई भागात सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले व सगळ्यांची तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी वृक्ष कोसळून नुकसान झाल्याची माहिती डिचोली अग्निशमक दलाचे अधिकारी राहुल देसाई यांनी दिली.

पिळगाव, नानोडा, वायंगिनी, मये, तोटेवाडा, पिळगाव, सारमानस, चोडण, केर, पाळी कुडणे वाळपई, सत्तरी आदी भागात मोठी पडझड झाली असून काही घरांचे नुकसान झाले. वायंगीणी मये येथे महानंदा गावकर, देऊ ठाणेकर, रुपेश गावकर यांच्या घरावर झाडाच्या फांद्या पडल्याने नुकसान झाले आहेत तसेच दोन वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती स्थानिक पंच वासुदेव गावकर यांनी दिली.

प्रचंड गर्मीने बेहाल झालेल्या डिचोलीवासीयांना अचानक पावसाने मोठा दिलासा दिला. मात्र वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पडझड झाली असून बरीच हानी झाल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. डिचोली अग्निशामक दलाचे जवान अविश्रांत मदत कार्यात गुंतले असून सुमारे २५ ठिकाणी पडझड झाल्याची माहिती अग्निशामक दलाच्या कार्यालयातून देण्यात आली.

# उपजिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्याचे कारनामे उघड

## बनावट कागदपत्रांद्वारे कर्जफसवणुकीचा आरोप : गुन्हा दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** केपे उपजिल्हाधिकारी कार्यालयातील मल्टी–टास्किंग स्टाफ म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने बनावट कागदपत्रांचा वापर करून विविध वित्तीय संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी वीरेश गावकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अंतर्गत चौकशीत गावकरने वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी अधिकृत कागदपत्रांचा गैरवापर केल्याचे उघड झाले. एफआयआरनुसार, त्याने बनावट पगार प्रमाणपत्रे, कार्यालयीन सील व अधिकाऱ्यांच्या नमुना स्वाक्षऱ्यांचा वापर करून विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेतले. विशेष म्हणजे, ही कागदपत्रे केपे उपजिल्हाधिकारी कार्यालयाने अधिकृतपणे जारी केलेली नव्हती.

या फसवणुकीचा पर्दाफाश तेव्हा झाला जेव्हा दीनदयाल मल्टीपर्पज को–ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या शाखा व्यवस्थापकाने कर्जाच्या थकबाकी संदर्भात उपजिल्हाधिकारी मनोहर कारेकर यांच्याशी संपर्क साधला. कर्ज घेतलेल्या व्यक्तीने नियमित हप्ते न भरल्यामुळे संस्थेने खात्री करून घेतली असता कागदपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले. यासंदर्भात अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली, ज्यात गावकरने कार्यालयाच्या मंजूर रजेच्या कालावधीत काही बनावट कागदपत्रे तयार करून त्यांचा गैरवापर केल्याचे स्पष्ट झाले.

प्राथमिक चौकशीत गावकरने तीन वेगवेगळ्या सहकारी संस्थांना बनावट कागदपत्रे सादर करून एकूण ३७ लाख रुपयांचे कर्ज घेतल्याचे समोर आले आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप केला असून, गावकर याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. तसेच, त्याची सेवा रद्द करण्याचा विचार सुरू आहे.

या तक्रारीच्या आधारे केपे पोलिसांनी वीरेश गावकर याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (बीएनएस ) २०२३ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये कलम ३३६(३)फसवणूक करून आर्थिक फायदा मिळवणे, कलम ३३७ – फसवणुकीच्या उद्देशाने बनावट कागदपत्रे तयार करणे, कलम ३४०– सार्वजनिक सेवकाने गुन्हेगारी विश्वासघात करणे, कलम ३१८(४) बनावट कागदपत्रांचा वापर अशा कलमांचा समावेश आहे. गावकरच्या फसवणुकीच्या प्रकरणाचा संपूर्ण तपास सुरू असून, यामध्ये इतर कोणी सामील आहे का, याचीही चौकशी केली जात आहे. प्रशासनाने अशा प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे संकेत दिले आहेत.



साखळी पुलावर पडलेला खड्डा.

# साखळी येथील पुलावर धोकादायक खड्डा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २५ :** साखळीहून डिचोलीला जाताना असलेल्या पुलावर पडलेला खड्डा धोकादायक बनला असून वाहन चालकांना याचा बराच त्रास होत आहे. साखळीहून डिचोलीला जाताना डाव्या बाजूला हा खड्डा असून त्या ठिकाणी पाण्याचे पाइपही फुटले असल्याने त्या खड्ड्यात पाणी भरलेले आहे. तसेच बरेच पाणी वाया जात आहे.

पुलावरील काही खड्ड्यांमध्ये डांबर घालून बुजविण्यात आले होते. सामोरासमोरून गाड्या आल्यावर वाहनांना बाजू देताना बराच त्रास होतो. कधीकधी या खड्ड्यातूनच वाहने हाकावी लागतात. अनेकजण या पुलावरून चालत जातात त्यावेळी त्यांच्यावरही पाणी पडते. शुक्रवारी २८ रोजी सांखळीत शिमगोत्सव असून यावेळी अनेकजण याठिकाणी येणार आहेत. वाहनांचीही वर्दळ वाढणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा खड्डा असून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.त्यामुळे संबंधितांनी कोणतीही अघटित घटना घडण्याअगोदर याची दुरुस्तीची करावी, अशी मागणी होत आहे.